# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 04.01.2026** **वार- रविवार**

---

**श्वसनविकार**

पुणे शहरात श्वसनविकाराच्या रुग्णांमध्ये वाढ झाली असून आत्तापर्यंत श्वसनविकारासह फ्लूचे 41 हजारपेक्षा जास्त रुग्ण आढळून आले आहेत. त्याखालोखाल अतिसाराचे सर्वाधिक 9 हजार रुग्ण आढळले आहेत. शहरातील वाढती वाहतूक, बांधकामांमधून उडणारी धूळ आणि कचरा जाळण्याचं वाढतं प्रमाण यामुळं हवेची स्थिती अधिकच गंभीर होत चालली आहे. सर्व शासकीय दवाखान्यांत तपासणी आणि औषधोपचार उपलब्ध आहेत त्याचा लाभ नागरिकांनी घ्यावा असं आवाहन  पुणे महापालिका  सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉक्टर  वैशाली जाधव यांनी केलं आहे.

**संमेलन**

माध्यमकर्मींनी चोखपणे त्यांचं काम केलं नाही तर त्यांची गरजच उरणार नाही, असं स्पष्ट मत ज्येष्ठ संपादक आणि लेखक गिरीश कुबेर यांनी आज सातारा साहित्य संमेलनात एका विशेष मुलाखतीत व्यक्त केलं. कुबेर म्हणाले की, आज प्रसार माध्यमांना उत्तरदायित्व उरलेलं नाही ही वस्तुस्थिती आहे. काही वृत्तपत्रांचे मालक विशिष्ट बाजू घेऊन पत्रकारिता करतात. परंतु त्यामुळं समग्र माध्यमांवर अप्रामाणिकपणाचा आरोप केला जातो. त्यातून पत्रकारिता सरसकट बदनाम होत राहते. वस्तुत: शरणता न दाखवणं हे माध्यमांचं प्रमुख कर्तव्य आहे. आपण समाज म्हणून गुणवत्तेला मान द्यायला शिकलो नाही. सत्ताशरण समाज ही आपली ओळख बनत चालली आहे. हे महाराष्ट्रासाठी जास्त धोकादायक आहे. सामाजिक संवेदना आणि आकलनाच्या मर्यादा दिसतात. आजही मोठा वाचकवर्ग पु लं च्या पुढे गेलेला नाही. माध्यमांनी निवडक वर्गाला प्राधान्य दिलं आहे. भूमिका न घेणं हे सडू लागलेल्या समाजाचं लक्षण आहे असे विचार कुबेर यांनी व्यक्त केलं.

**एक-खिडकी**

पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी उभे असलेल्या उमेदवारांना प्रचारकार्यासाठी महापालिकेकडून निवडणूक कक्षाची परवानगी घेणं आवश्यक आहे. या एक खिडकी परवानगी कक्षाचं उद्घाटन आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते झालं. या कक्षाद्वारे प्रचारफेरी आणि सभा मिरवणूक, तसंच विविध परवानगी प्रमाणपत्र देण्याची यंत्रणा कार्यरत करण्यात आली आहे.

**बिनविरोध**

पुण्यासह विविध महापालिकांवर भरमसाठ पैसे देऊन आणि गैरमार्गानं काही उमेदवार बिनविरोध निवडले गेल्याचा आरोप आम आदमी पक्षानं केला आहे. अशा उमेदवारांची निवड रद्द करुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी आम आदमी पक्षाचे पुणे शहर अध्यक्ष धनंजय बेनकर यांनी राज्य निवडणूक आयोगाकडं निवेदनाद्वारे केली आहे.

**दीक्षांत**

पिंपरी चिंचवड विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षांत समारंभास कुलपती म्हणून माजी मंत्री, हर्षवर्धन पाटील यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पद्मभूषण पुरस्कार विजेते, प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरूडॉ. नितीन करमळकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**वर्धापनदिन**

पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळेचा 127 वा वर्धापन दिन शाळेत उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी नवीन मराठी शाळा आणि रानडे बालक मंदिराचे कर्मचारी, विद्यार्थी, अनेक शाळांचे आजी, माजी मुख्याध्यापक उपस्थित होते.

**बाजारभाव**

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज विविध राज्यातून सुमारे शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. हिरवी मिरची आणि तोतापुरी कैरीतील दरवाढ वगळता सर्व फळभाज्यांचे भाव स्थिर आहेत. बोरांचा हंगाम सुरु असून मागणीही वाढल्यानं त्यांच्या भावात वाढ झाली तर डाळिंब आणि मोसंबीदेखील महागले आहेत. फुल बाजारातील मंदी या आठवड्यातही कायम आहे आवक जेमतेम असली तरी बहुतांश फुलांच्या भावात 20 ते 30 टक्क्यांपर्यंत घसरण झाली आहे.

**सप्ताह**

श्री देशमुख महाराज फाऊंडेशनच्या वतीनं परमपूज्य श्री गंगाधर स्वामी यांच्या 19 व्या समाधी सोहळ्यानिमित्त देशी गायींच्या प्रजातींबाबत जनजागृती करण्यासाठी पुण्यात प्रथमच गौ-कथा सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे. हा सोहळा 8 ते 14 जानेवारी या कालावधीत होणार आहे अशी माहिती संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णा बालेघाटे यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. या सप्ताहात गौसेवा करणा-या संस्था आणि गोरक्षकांचा सन्मान, तसंच देशी गायींच्या विविध प्रजातींचं प्रदर्शन आयोजित आहे.

**एकल-माता**

राज्यातील एकल मातांच्या मुलांना शिक्षणासाठी सुविधा देण्याच्या अनुषंगानं प्राथमिक शिक्षण संचालनालयानं प्रथमच एकल मातांच्या मुलांचं सर्वेक्षणाचं काम पूर्ण केलं आहे. त्यानुसार राज्यात एकल मातांची 2 लाख 23 हजारपेक्षा जास्त मुलं पहिली ते बारावी इयत्तांमध्ये शिकत आहेत. त्यात सर्वाधिक 14 हजार 367 मुलं नाशिक जिल्ह्यातील आहेत. एकल मातांच्या पहिली ते बारावीपर्यंतच्या मुला-मुलींची संख्या संकलित करून शासनाला सादर करायची असल्यानं एकल मातांच्या मुलांचे सर्वेक्षण करून जिल्हानिहाय आकडेवारी सादर करण्याच्या सूचना प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी राज्यातील शिक्षण विभागातील संबंधित अधिकाऱ्यांन्या परिपत्रकाद्वारे दिल्या होत्या.

**माजीविद्यार्थी मेळावा**

पुण्यातील माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी विद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा पार पडला. माजी विद्यार्थी हे शाळेची संपत्ती असतात असं प्रतिपादन शाला समिती अध्यक्ष मिलिंद कांबळे यांनी यावेळी व्यक्त केलं. मुख्याध्यापिका वासंती बनकर,अपर्णा साने , प्रसाद लागू आदि मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**